1 6 JUL 2023 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ: कोल्हापूर

# ...तर कायद्याच्या विरोधात लढा द्या

## हरीष भालेराव : दिनकर खाबडे लिखित पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : समता, स्वातंत्र्य व बंधुभाव माणसाला कसा प्राप्त होऊ शकेल यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदा म्हणजे संविधान महत्त्वाचे मानले. कायदा जर हे माणसाला देत नसेल, तर अशा कायद्याविरोधात लोकांनी लढले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. हरीष भालेराव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने प्राचार्य डॉ. दिनकर खाबडे लिखित 'दि सोशल रिफॉर्म मूव्हमेंट अँड डॉ. आंबेडकर्स इंटलेक्चुअल जस्टिफिकेशन फॉर ह्युमन इक्वालिटी अँड जस्टीस' (सामाजिक सुधारणा चळवळ व मानवी समानता आणि न्यायासाठी डॉ. आंबेडकरांचे बौद्धिक समर्थन) या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.



शिवाजी विद्यापीठात डॉ. दिनकर खाबडे लिखित पुस्तकाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के व प्राचार्य डॉ. हरीष भालेराव यांच्या हस्ते प्रकाशन झाले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.

भालेराव म्हणाले, एखादा सामाजिक गटच अन्याय करू लागला व विशिष्ट समाजाचे अधिकार नाकारू लागला तर सामाजिक गटाला शिक्षा कशी करता येईल हा डॉ. आंबेडकर यांच्यासमोर महत्त्वाचा प्रश्न होता. अशावेळी समता, स्वातंत्र्य व बंधुभाव यांचा न्याय हा पाया असला पाहिजे. कुलगुरू डॉ. शिर्के, डॉ. खाबडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

# 'दूरशिक्षण'मधील विद्यार्थ्यांनी गिरवले परदेशी विद्यापीठातील कौशल्याचे धडे!


## इन्फोसिस स्प्रिंग बोर्ड डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील एम. कॉमच्या विद्यार्थ्यांनी परदेशी विद्यापीठातील कौशल्याचे धडे गिरवले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमात बदल केले आहेत. त्यानुसार एम. कॉम. अभ्यासक्रमासाठी शिवाजी विद्यापीठ अभ्यास मंडळाने अभ्यासक्रमास दिलेल्या मान्यतेनुसार कौशल्य वृद्धिंगत अभ्यासक्रमांतर्गत एम. कॉम. भाग १ सत्र २ च्या विद्यार्थ्यांनी इन्फोसिस स्प्रिंग बोर्ड या डिजिटल प्लॅटफॉर्मवरून मार्केटिंग इन अ डिजिटल वर्ल्ड हा युनिव्हर्सिटी ऑफ लणोईस ॲट अर्बन - कॉम्पेन ॲंड ऑफर्ड थ्रो कोर्सेस, एम. कॉम. भाग १ सत्र २ मधील विद्यार्थांनी एक्सेल स्किल्स फॉर बिझनेस : इंटरमिडियट II हा मक्युएरिय युनिव्हर्सिटी ॲंड ऑफर्ड थ्रो कोर्सेस या परदेशी विद्यापीठाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी १८४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली.

इन्फोसिस स्प्रिंग बोर्ड डिजिटल पोर्टलच्या माध्यमातून परदेशी विद्यापीठाच्या कौशल्य प्रमाणपत्र




अभ्यासक्रमाचे धडे घेतले. यामध्ये इन्फोसिस स्प्रिंग बोर्ड उपक्रमांतर्गत २०२५ पर्यंत १० दशलक्षांहून अधिक विद्यार्थ्यांना डिजिटल व जीवन कौशल्य देऊन सक्षम बनवण्यात येणार आहे.

कौशल्य वृद्धिंगत अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, सी. एस. कोतमिरे, समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कोर्स समन्वयक म्हणून डॉ. पी. एन. देवळी यांनी काम पाहिले.

वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता प्रा. डॉ. एस. एस. महाजन यांच्या हस्ते व्यवस्थापन अभ्यासमंडळ सदस्य डॉ. एस. एस. भोला, व्यवस्थापन अभ्यासमंडळ अध्यक्ष डॉ. शर्वरी कुलकर्णी, व्यवस्थापन अभ्यास मंडळ सदस्य डॉ. प्रतिभा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

"

दूरशिक्षण केंद्रांतर्गत विद्यार्थ्यांसाठी कौशल्य वृद्धिंगत प्रमाणपत्र अभ्यासक्रम इन्फोसिस स्प्रिंग बोर्ड डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अभिनव उपक्रम राबवला. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी परदेशी विद्यापीठाचे कौशल्य आधारित कोर्स पूर्ण केल्यास रोजगारच्या संधी निश्चित प्राप्त होतील.

**- प्रा. डॉ. डी. के. मोरे, संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र**

कौशल्य वृद्धिंगत अभ्यासक्रम पूर्ण केल्याने डिजिटल व जीवन कौशल्ये आम्हा विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहेत. त्यामुळे याचा फायदा भविष्यात निश्चित होणार आहे.

**- प्रियांका पाडळकर**, विद्यार्थिनी

पुढारी



कोल्हापूर : दूरशिक्षण अभ्यास केंद्रातील समन्वयक, लेखनिकांसाठीच्या प्रवेश प्रक्रिया कार्यशाळेत बोलताना डॉ. आर. डी. पडवळ. डॉ. डी.के.मोरे, डॉ.ए. ए.रेडेकर आदी.

# दूरशिक्षण काळाची गरज : डॉ. पडवळ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दूरशिक्षण पद्धतीतून अद्ययावत शिक्षण दिले जात असल्याने दूरशिक्षण ही आजच्या काळाची गरज बनत चालली आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. आर. डी. पडवळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे आयोजित महाविद्यालयातील दूरशिक्षण अभ्यास केंद्रातील समन्वयक व लेखनिकांसाठीच्या प्रवेश प्रक्रिया कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते.

संगणक विभागाचे संचालक डॉ.ए. ए.रेडेकर, सिस्टीम प्रोग्रामर आशिष घाटे यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शन केले. डॉ.पी. एस.लोंढे यांनी एबीसी आयडी तयार करण्याबाबत व डॉ.पी.एस. देवळी यांनी दुहेरी पदवी अर्ज भरण्यासाठीचे प्रात्यक्षिक दाखवले. यावेळी डॉ. के. बी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. के. वी. पाटील, डॉ. दत्तात्रय कमलाकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. परशुराम देवळी यांनी केले. डॉ. सी. ए. बंडगर यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव सी.एस. कोतमिरे, शशी हुक्केरी, सहा. कुलसचिव उदय करवडे, विश्वास शिरोळे, नितिन सालोखे, विश्वनाथ वरूटे आदी उपस्थित होते.

लोकमत

# दूरशिक्षण पद्धतीतून अद्ययावत शिक्षण : डॉ. आर. डी. पडवळ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : दूरशिक्षण पद्धतीतून अद्ययावत शिक्षण दिले जात असल्याने दूर शिक्षण ही आजची गरज बनत चालली आहे, असे मत शिवाजी विद्यापीठातील सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. आर. डी. पडवळ यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्यावतीने आयोजित महाविद्यालयातील दूरशिक्षण अभ्यास केंद्रातील समन्वयक व लेखनिकांसाठीच्या प्रवेश प्रक्रिया कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते.

डॉ. पडवळ म्हणाले, विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन याचबरोबर संवादकौशल्य शिकविल्यास विद्यार्थ्यांचा दूरशिक्षण केंद्राकडे कल वाढेल. दूरशिक्षण पद्धतीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी हे नोकरी करणारे, नोकरी न करणारे, नोकरी करीत नाहीत, पण स्पर्धात्मक परीक्षेत सहभाग घेणारे आणि स्वतंत्र उद्योग करू पाहणारे विद्यार्थी असतात. त्यामुळे त्यांना कौशल्यावर आधारित शिक्षण दिल्यास रोजगाराभिमुख व्यक्तिमत्त्व तयार होईल. यावेळी उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे, आय. टी. विभागाचे शशी हुक्केरी, सहा. कुलसचिव उदय करवडे, विश्वास शिरोळे, नितीन साळोखे, विश्वनाथ वरुटे उपस्थित होते.

लोकमत

# दूरशिक्षण केंद्राची उद्या एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया फेरी उद्या सोमवारी सकाळी नऊ वाजता घेण्यात येणार असल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. एमबीए अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एम.बी.ए (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी एमबीए (डिस्टन्स मोड) प्रवेशासाठी ११ मे २०२३ रोजीची प्रवेश परीक्षा दिली आहे, अशा विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा. डॉ. डी. के.मोरे यांनी केले.

पुढारी

# पंचगंगा नदी प्रदूषणमुक्तीसाठी सेमीकंडक्टर फोटो कॅटलिस्टचा उपयोग

## डॉ. अविराज कुलदीप यांना 'स्वच्छता सारथी' फेलोशिप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागामधील डॉ. अविराज कुलदीप हे केंद्र सरकारच्या प्रकल्पांतर्गत पंचगंगा नदीमधील पाण्याचे प्रदूषण व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय यावर संशोधन करण्यासाठी सेमीकंडक्टर फोटो कॅटलिस्टचा वापर करणार आहेत.

पंचगंगा नदी कोल्हापूर व इचलकरंजी शहराची जीवनदायी मानली जाते. मानवी हस्तक्षेप, औद्योगिक सांडपाणी, उद्योगांचे प्रक्रिया केलेले पाणी थेट नदीत मिसळते. यावर्षी मार्च महिन्यात जलप्रदूषणामुळे हजारो मासे मरण पावले. केवळ जलचरच नव्हे, तर मानवालादेखील समस्येने ग्रासले आहे. रंगमिश्रणामुळे पाणी इतके दूषित होते की, ते पिण्यासाठी अयोग्य होते. फेलोशिपअंतर्गत जिल्ह्यातील पाण्याचे प्रदूषण मुख्यत्वे करून पंचगंगा नदी, त्याची कारणे व त्याच्यावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सेमीकंडक्टर फोटो कॅटलिस्टचा उपयोग याविषयी कार्य करण्यात



येणार आहे. प्रकल्पासाठी डॉ. के. एम. गरडकर, डॉ. डी. एम. पोरे, डॉ. जी. एस. राशिनकर, डॉ. एस. एन. तायडे, डॉ. आर. एम. माने यांचे मार्गदर्शन लाभले.

### नऊ वैज्ञानिक मोहिमांपैकी एक

स्वच्छ भारत, उन्नत भारत योजनेअंतर्गत भारत सरकारच्या प्रधान वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाकडून 'स्वच्छता सारथी' फेलो पुरस्कार-२०२२ (श्रेणी-ब) ने नुकतेच सन्मानित करण्यात आले. देशभरातील ३६ राज्यांमधून १२५ फेलोंची निवड झाली असून यात डॉ. कुलदीप यांचा समावेश आहे. वेस्ट टू वेल्थ मिशन हे पंतप्रधानांच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम सल्लागार परिषदेच्या नऊ वैज्ञानिक मोहिमांपैकी एक आहे.

16 JUL 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पंचगंगा प्रदूषणप्रश्नी होणार संशोधन

## डॉ. अविराज कुलदीप यांना स्वच्छता सारथी फेलोशिप

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागामधील हंगामी शिक्षक डॉ. अविराज कुलदीप यांना स्वच्छ भारत उन्नत भारत योजनेअंतर्गत भारत सरकारच्या प्रधान वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाकडून स्वच्छता सारथी फेलो पुरस्काराने-२०२२ (श्रेणी-ब) ने सन्मानित करण्यात आले.



डॉ. कुलदीप हे कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीमधील पाण्याचे प्रदूषण व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय यावर संशोधन करण्यासाठी सेमीकंडक्टर फोटो कॅटलिस्टचा वापर करणार आहेत. मिशनचे उद्दिष्ट कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी तंत्रज्ञान ओळखणे, विकसित करणे आणि उपयोजित करणे, ऊर्जा निर्माण करणे, सामग्रीचे पुनर्वापर करणे आणि मूल्यवान संसाधने काढणे हे आहे. स्वच्छ आणि हरित वातावरण निर्माण करण्याचे वचन देणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासाला ओळखण्यासाठी' आणि त्यांना पाठिंबा देण्यासाठीदेखील हे मिशन आदे. देशातील कचरा हाताळणी सुव्यवस्थित व्यवस्थापनासाठी आर्थिकदृष्ट्या सक्षम असे आर्थिक मॉडेल तयार करण्यासाठी हे मिशन वापरून स्वच्छ भारत आणि स्मार्ट सिटी प्रकल्पांना मदत करण्यास तत्पर आहे. डॉ. कुलदीप यांनी निवड झाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. के. डी. सोनवणे यांनी अभिनंदन केले. या प्रकल्पासाठी डॉ. के. एम. गरडकर, डॉ. डी. एम. पोरे, डॉ. जी. एस. राशिनकर, डॉ. एस. एन. तायडे, डॉ. आर. एम. माने यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी

# डॉ. कुलदीप यांना सारथी फेलोशिप

कोल्हापूर : प्रतिनिधी



शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागामधील हंगामी शिक्षक डॉ. अविराज कुलदीप यांना स्वच्छ भारत उन्नत भारत योजनेंतर्गत भारत सरकारच्या प्रधान वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाकडून स्वच्छता सारथी फेलो पुरस्कार-२०२२ (श्रेणी-ब)ने सन्मानित करण्यात आले. देशभरातील ३६ राज्यांमधून १२५ फेलोंची निवड केली आहे. याअंतर्गत डॉ. कुलदीप हे पंचगंगा नदीमधील पाण्याचे प्रदूषण व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय यावर संशोधन करण्यासाठी सेमी कंडक्टर फोटो कॅटलिस्टचा वापर करणार आहेत.

त्यांची निवड झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. के. डी. सोनवणे यांनी अभिनंदन केले. त्यांना डॉ. के. एम. गरडकर, डॉ. डी. एम. पोरे, डॉ. जी. एस. राशिनकर, डॉ. एस. एन. तायडे, डॉ. आर. एम. माने यांचे मार्गदर्शन लाभले.

महासत्ता

# विद्यापीठात ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयावर शुक्रवारी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**कोल्हापूर, ता.१५ (प्रतिनिधी)-**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील ब. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय परिषद दि. २१ जुलै रोजी आयोजित केली आहे.**

या कार्यक्रमासाठी संसाधन प्रमुख म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, ज्ञान स्त्रोत केंद्राचे माजी संचालक डॉ. मोहन खेरडे, पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील माजी प्राध्यापक डॉ.राजेंद्र कुंभार तसेच कर्नाटक विद्यापीठ धारवाड, येथील सहयोगी प्राध्यापक प्रो. गुरुराज हडगली उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमात सहभागी होण्यासंबधीची विस्तृत माहिती विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे किंवा समक्ष भेटून परिसंवादास नोंदणी करण्याचे आवाहन परिषद संयोजक यांनी केले आहे.याचा ग्रंथालय क्षेत्रातील सर्व इच्छुकांनी लाभ घेण्याचे आवाहन परिषदेचे आयोजक सचिव डॉ. पी.बी.बिलावर, उपग्रंथपाल शिवाजी विद्यापीठ यांनी केले आहे.


पुढारी

# विद्यापीठात २१ जुलै रोजी राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्र व ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जुलै रोजी एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमासाठी संसाधन प्रमुख म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, ज्ञान स्रोत केंद्राचे माजी संचालक डॉ. मोहन खेरडे, पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील माजी प्रा. डॉ. राजेंद्र कुंभार, कर्नाटक विद्यापीठ धारवाड, येथील सहयोगी प्रा. गुरुराज हडगली मार्गदर्शन करणार आहेत. 'रिवॅम्पिग लायब्ररीज इन मॉडन एरा' या विषयावरील परिसंवादात आधुनिक कालखंडातील ग्रंथालय शास्त्र व ग्रंथालयाच्या बदलत्या स्वरूपांचा अभ्यास होणार आहे. परिसंवादात संशोधन पत्रिकांचे सादरीकरण होणार आहे. सहभागी होण्याचे आवाहन डॉ. पी. बी. बिलावर यांनी केले आहे.

पुढारी



# एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरी १७ जुलै रोजी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एम. बी. ए. (डिस्टन्स मोड) अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्षासाठी घेतलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया फेरी सोमवारी (दि. १७) सकाळी नऊ वाजता घेण्यात येणार असल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रॉडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी एमबीए (डिस्टन्स मोड) प्रवेशासाठी ११ मे रोजी प्रवेश परीक्षा दिली आहे, अशा विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी संबधित कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पुढारी

# विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्रातील ४८५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत आजअखेर सुमारे ४८५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत.

शनिवारी मास्टर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला २६३५ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, एम.एस्सी. (स्टॅटॅस्टिक), नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम.कॉम., एम.ए. आदी १४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.